# चंद्रपुर जिल्हा सायबर पोलीस ठाणे

## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपुर

**Email: cybercell.chandrapur@mahapolice.gov.in**
**Phone: - 07172 - 264300**

सायबर पोस्टे/समाज माध्यम नोटीस/२०१९चंद्रपुर — दिनांक १४/१०/२०१९

## कलम १४९ फौजदारी प्रक्रिया संहिता प्रमाणे नोटीस

प्रति,

चंद्रपुर जिल्ह्यातील सर्व व्हॉट्सअॅप, फेसबुक,
इंस्टाग्राम, ट्विटर ग्रुप अॅडमीन/सदस्य/वापरकर्ते यांना..

*****

आपणास या नोटीसव्दारे सुचित करण्यात येते की, सध्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुक २०१९ आदर्श आचारसंहिता सुरू आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने विविध राजकिय पक्षातील उमेदवार निवडणुकरीता उभे आहेत.

राजकीय पक्षातील उमेदवार व त्यांचे प्रतिनीधी किंवा इतर कोणतेही इसम यांनी धार्मिक भावना दुखावणाऱ्या तसेच निवडणुकी निकालांवर परिणाम करतील अशा पोस्ट/मजकुर/फोटो व्हॉट्सअॅप किंवा सोशल मिडीयाच्या मार्फत मोठया प्रमाणात चालु असल्याची दाट शक्यता आहे.

आपण आपले व्हॉट्सअॅप व सोशल मीडीया वर राजकीय पक्ष व उमेदवार बाबत वैयक्तीक टिपा टिप्पणी तसेच धार्मीक भावना दुखावणाऱ्या पोस्ट टाकु नयेत. व्हॉट्सअॅप, फेसबुक, इंस्टाग्राम व ट्विटर वर आक्षेपार्ह स्वरूपाच्या पोस्ट्स प्रदर्शित करून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल अशा पोस्ट/मजकुर/फोटो (टिप्पनी) प्रदर्शित केलेल्या व्यक्तीस व सदर ग्रुप मधील अॅडमिन यांना जबाबदार धरण्यात येईल व त्यांचे विरूद्ध प्रचलीत कायद्यान्वये कार्यवाही करण्यात येईल.

सदर नोटीसचा आपणविरूध्द मा. न्यायालयात पुरावा म्हणुन वापर केला जाईल याची चंद्रपुर जिल्हयातील सर्व व्हॉट्सअॅप, फेसबुक, इंस्टाग्राम व ट्विटर वापरकर्त्यांनी नोंद घ्यावी.

चंद्रपूर जिल्हा सायबर पोलीस ठाणे — महाराष्ट्र शासन — सत्यमेव जयते — चंद्रपूर

14/10

सहा. पोलीस निरीक्षक
सायबर पोलीस ठाणे, चंद्रपुर